# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ३०.०५.२०२५

जिल्हा : सांगली

| मागील आठवड्यातील हवामान (२४.०५.२०२५ ते ३०.०५.२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (३१.०५.२०२५ ते ०४.०६.२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | दिनांक | ३१ | ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ३ | ३ | ५ | ७ | ३ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३१ | ३२ | ३२ | ३३ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २४ | २४ | २४ | २५ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ५ | ६ | ७ | ७ | ५ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८३ | ८१ | ७७ | ८० | ८१ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८२ | ७३ | ७१ | ७६ | ७२ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २४ | २५ | २३ | २३ | २२ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | प. | प.नै. | प.नै. | प.नै. | प.नै. |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सांगली जिल्ह्यामध्ये जिल्ह्यामध्ये दिनांक ३१ मे ते ४ जून दरम्यान आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक ३१ मे, १, २, ३ व ४ जून रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यामध्ये पुढील ५ दिवसांत कमाल कमाल तापमान ३०.० ते ३३.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवसांत किमान तापमान २४.० ते २५.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ७७ ते ८३% या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता ७१ ते ८२% या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी २२ ते २५ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ४ ते १० जून, २०२५ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी तसेच कमाल तापमान सामान्यत: सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ खरीप हंगामामध्ये पिक घेण्यासाठी जमिनीची पूर्व मशागत (नांगरणी) करून घ्यावी. खरीप हंगामामध्ये कडधान्य पिक घेण्यासाठी जमिनीची खोल नांगरट करून कुळवाच्या दोन पाळया द्याव्यात व शेवटच्या कुळवणी अगोदर हेक्टरी ५ टन कंपोस्ट/शेणखत शेतात मिसळावे. |
| संदेश | | सुधारित/संकरीत वाणांचे बियाणे शासन अधिकृत यंत्रणेकडून अथवा कृषि विद्यापिठाच्या विक्री केंद्राकडून खरेदी करावे. |
| मका | पेरणीपूर्व तयारी | ➢ जमिनीची निवड: धान्यासाठी तसेच चाऱ्यासाठी मध्यम ते भारी, खोल, रेतीयुक्त, उत्तम निचऱ्याची, अधिक सेंद्रिय पदार्थ आणि जलधारणा शक्ति असलेली जमीन चांगली. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ असावा.<br>➢ पूर्व मशागत : जमिनीची खोल (१५ ते २० सें.मी.) नांगरट करावी. कुळवाच्या २-३ पाळया देऊन जमीन भूसभुशीत करावी. शेवटच्या कुळवाच्या पाळीच्या वेळी हेक्टरी १० ते १२ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत चांगले मिसळावे. |
| सोयाबीन | पूर्व मशागत | ➢ जमीन: मध्यम खोलीची चांगली निचरा होणारी<br>➢ पूर्व मशागत : एक नांगरट व कुळवाच्या २-३ पाळया देऊन जमीन भूसभुशीत करावी.<br>➢ भरखते : चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत हेक्टरी १२ ते १५ टन शेणखत मिसळावे.<br>➢ खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. |
| भुईमूग | पूर्व मशागत | ➢ जमीन: मध्यम खोलीची, भुसभुसित, चुना व सेंद्रिय पदार्थ योग्य प्रमाणात असलेली व पाण्याचा उत्तम निचरा होणारी<br>➢ पूर्व मशागत : एक नांगरट व कुळवाच्या २-३ पाळया द्याव्यात<br>➢ भरखते : पूर्व मशागतीच्या वेळी शेवटच्या कुळवाच्या आगोदर प्रती हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीमध्ये मिसळावे.<br>➢ खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. |
| टोमॅटो | रोपवाटिका तयार करणे | ➢ खरीप हंगामामध्ये टोमॅटो लागवडीसाठी ३ मि लांबी, १ मि. रुंदी व १५ सें.मी. उंचीचे गादी वाफे तयार करावेत. वाफ्यामधील दगड, ढेकळे काढून टाकावेत व प्रत्येक वाफ्यात एक घमेले चांगले कुजलेले शेणखत, ५० ग्रॅम कॉपर ऑक्झीक्लोराईड व १०० ते १५० ग्रॅम सुफला मिसळून घ्यावा व वाफा सपाट करून घ्यावा. वाफ्यावर ४ बोटांच्या अंतरावर वाफ्याच्या रुंदीशी समांतर रेघा पाडाव्यात व अश्या ओळींमध्ये बी पातळ पेरावे व नंतर हलक्या हाताने झाकून टाकावे. त्यांनतर वाफ्याला झारीने पाणी द्यावे. हंगामानुसार रोपे ३ ते ५ आठवड्यात लागवडीसाठी तयार होतात.<br>➢ लागवडीसाठी भाग्यश्री व धनश्री हे वाण तसेच लांबच्या बाजारपेठेसाठी : फुले राजा हे संकरीत वाण, अधिक बीटा कॅरोटीनयुक्त फुले केसरी, चेरी टोमॅटो : फुले जयश्री हे वाण वापरावेत.<br>➢ पाण्याचा खात्रीशीर स्त्रोत उपलब्ध असल्यासच रोपवाटिका तयार करण्यास सुरवात करावी. |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ **हुमणी :** वळवाचा पहिला पाऊस झाल्यावर हुमणीचे भुंगेरे सायंकाळी बाभूळ, कडूनिंब, व बोर या झाडांवर जमा होतात. आगोदर मादी भुंगेरे व त्यानंतर नर भुंगेरे जमिनीतून बाहेर पडतात. या झाडांवर बसून ते झाडांचा पाला खातात. अश्या झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करून रॉकेल मिश्रित पाण्यात टाकूण त्यांचा नाश करावा. |
| आले | लागवड | ➢ खात्रीशीर पाण्याची उपलब्धता असल्यास आले लागवड जुनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करावी.<br>➢ लागवडीसाठी वरदा, रिजाथा, माहिम, महिमा यासुधारीत जातींची निवड करावी.<br>➢ कंद ४ ते ५ सें.मी. खोल लावावेत. कंद पुर्ण झाकले जातील याची दक्षता घ्यावी. आल्याला मध्यम प्रकारची सुर्यप्रकाशाची आवश्यकता असते.<br>➢ जमिनीच्या उताराप्रमाणे लागणीची पध्दत निश्चित करुन जमिनीवर उताराच्या दिशेने बेड उठवून घ्यावेत. बेड एकसारखे सपाट होतील याची काळजी घ्यावी.<br>➢ बेड तयार करताना ट्रॅक्टरच्या फनपाळयाचे सरळ बेड तयार करावे. लागणीचे वेळी आढीत ठेवलेले बियाणे बाहेर काढून त्याचे एकसारखे तुकडे करुन (मोड) घ्यावेत.<br>➢ आल्याचा तुकडा ज्या दिवशी जमिनीत पुरला जाईल त्याच दिवशी त्या जमिनीस भरपूर पाणी मिळालेच पाहिजे. पाणी जमिनीस एवढे द्यावे किमान लावलेल्या तुकड्याच्या खाली चार ते पाच इंच संपूर्ण ओल गेलेली असावी. अन्यथा दुसऱ्या दिवशी पुन्हा तेवढेच पाणी द्यावे. व त्यानंतरच्या पाण्याच्या पाळया जमिनीच्या प्रतवारीनुसार एक दिवसा आड एक दिवस किंवा दोन आड एक दिवस अशी ओल कायमस्वरुपी राखून ठेवली जाईल एवढेच पाणी द्यावे.<br>➢ लागणीपासून आठ दिवसांनी हलकी भर टाकावी, कारण लागणी वेळी लांब तुकड्याची टोके जमिनीच्या पृष्ठभागाबरोबर असतात. त्यास उष्णतेची झळ लागू नये किंवा उघडे असणारे डोळे खराब होऊ नयेत म्हणून या भरीची आवश्यकता आहे.<br>➢ लागवड केल्यानंतर जमिनीचे तापमान सिंचन देऊन नियंत्रित करणे गरजेचे आहे. जमिनीचे तापमान बाहेरील वातावरणाच्या तुलनेत जास्त असते. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे बेण्यातील ओलावा टिकवुन ठेवणे आवश्यक आहे. बेण्यातील ओलावा कमी झाल्यास उगवण शक्ती व येणाऱ्या फुटव्यावर परिणाम होतो. |
| हळद | लागवड | ➢ खात्रीशीर पाण्याची उपलब्धता असल्यास जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत हळद लागवड पूर्ण करावी.<br>➢ लागवडीसाठी फुले स्वरूप, सेलेम, कृष्णा, राजापुरी आणि टेकुरपेटा वाण वापरावेत.<br>➢ लागवडीसाठी २५ ते ३० क्विंटल गड्डे बियाणे प्रती हेक्टरी या प्रमाणात वापरावे.<br>➢ आंतरपिके: हळद+घेवडा, हळद+ मेथी, हळद+ मिरची<br>➢ खते: लागवडीपूर्वी प्रती हेक्टरी २५ ते ४० टन चांगले कुजलेले शेणखत मिसळून टाकावे. तसेच १०० किलो स्फुरद व १०० किलो पालाश द्यावे.<br>➢ सेंद्रिय हळद<br>१. जैविक बीज प्रक्रिया: हेक्टरी ५०० लिटर पाण्यात व्हॅम १२.५ किलो + पी.एस.बी. ५ किलो + ॲझोस्पिरीलीयम ५ किलो मिसळून द्रावणात १५ मिनिटे कंद बुडवावेत.<br>२. खतांची मात्रा: शेणखत १५ ते २० टन/हे. + लिंबोळी पेंड ४ टन/हे. + गांडूळ खत २ टन/ हे द्यावे. |
| पशुधन | वाढीची | ➢ तज्ञ पशुवैद्यकाच्या सल्ल्याने जनावरांना लाळखुरकत, फऱ्या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोगप्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात. |
| कुक्कुटपालन | वाढीची | पावसाळ्यात कोंबड्यांची काळजी<br>१. **निवारा आणि निवासस्थान:**<br>➢ कोंबड्यांच्या शेडचे छप्पर **गळतीविरहित आणि मजबूत** असावे.<br>➢ शेडमधील जमिनीवर **कोरडे आणि स्वच्छ आच्छादन (सडा/चोथा)** वापरावे.<br>➢ पावसाचे पाणी शेडमध्ये शिरू नये, यासाठी चांगली **निचरा व्यवस्था** करावी.<br>➢ थंडी आणि ओलावा टाळण्यासाठी शेड **हवा खेळती ठेवावी**, पण थेट वाऱ्यापासून संरक्षण द्यावे.<br>२. **स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण:**<br>➢ शेड नियमितपणे स्वच्छ व निर्जंतुक ठेवावा.<br>➢ ओले व सडलेले आच्छादन लगेच काढून टाकावे आणि नवीन कोरडे साहित्य टाकावे.<br>➢ ओलसरपणा टाळल्यास श्वसनाचे विकार व पायाचे रोग टाळता येतात.<br>३. **खाद्य व पाणी:**<br>➢ खाद्य कोरड्या व हवाबंद डब्यात साठवावे, जेणेकरून बुरशी न लागू शकेल.<br>➢ स्वच्छ आणि ताजे पिण्याचे पाणी नेहमी उपलब्ध करून द्यावे.<br>➢ विटॅमिन अ व क युक्त टॉनिक पाण्यात टाकल्यास रोगप्रतिकारक शक्ती वाढते.<br>४. **आरोग्य व रोग नियंत्रण:**<br>➢ कोक्सीडिओसिस, फाउल कॉलरा व श्वसन विकारांची लक्षणे ओळखून तत्काळ उपाय करावा.<br>➢ नियमित लसीकरण व जंतनाशक औषध द्यावे.<br>➢ आजारी पक्षी इतरांपासून वेगळे ठेवावेत.<br>५. **डास व परजीवी नियंत्रण:** |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | ➢ शेडच्या आजूबाजूचे सांडपाण्याचे साठे काढून टाकावेत.<br>➢ डास प्रतिबंधक जाळया वापराव्यात किंवा सुरक्षित कीटकनाशक फवारावे.<br>➢ परजीवी (जसे की उवा, माईट्स) नियंत्रणासाठी धुळीच्या स्वरूपात औषध वापरावे. |

| मेघदूत ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |
|---|---|

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई

**ठिकाण : कोल्हापूर**

**दि. :३०.०५.२०२५**

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**